स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीच्या शोध प्रबंधाचा पुर्व संशोधन आराखडा

"मराठवाडा विभागातील नाभिक समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा" (सन 2014 ते 2025)

संशोधक

बालाजी गोविंद कोंडामंगल

एम.ए., एम.फिल. (अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.स्वामी एस.डी.

श्री दत्त कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हदगांव

ता.हदगांव जि.नांदेड

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल

स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड

२०२३

अनुक्रमणिका

प्रकरण	प्रकरणाचे नांव
पहिले	प्रस्तावना संशोधन पध्दती संशोधन साहित्याचा संक्षिप्त आढावा
दुसरे	ग्रामीण समुदाय, बलुतेदारी आणि नाभिक समाज
तिसरे	नांदेड जिल्हा एक दृष्टिक्षेप
चौथे	गृहितकृत्याची सिध्दता, तथ्य संकलन व विश्लेषण
पाचवे	निष्कर्ष व शिफारशी
	परिशिष्टे
	संदर्भग्रंथ सुची
	मुलाखत अनुसुची

प्रस्तावना
संशोधन पध्दती
संशोधन साहित्याचा संक्षिप्त आढावा

१.१ प्रस्तावना :

भारतीय समाज व्यवस्था ही जाती व्यवस्थेवर आधारीत असून समाज व्यवस्थेतील बदल म्हणजे जाती व्यवस्थेतील बदल असे मात्र नाही कारण जाती ही धार्मिक दृष्ट्या पवित्र जाणीव आहे. तसेच हिंदु धर्मातील परिवर्तन हे जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी झाल्याचे कधीच आढळत नाही. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर भारतातही जातीव्यवस्थेत मोठा बदल झाला नाही. भारतीय संविधानाने जातीय अस्पृश्यता पाळण्यावर कठोर नियम केल्यामुळे अस्पृश्यता पाळण्यासंदर्भातील व्यवहारात कमी प्रमाणात का होईना बदल झाला आहे. पण वर्तनात मात्र मोठ्या प्रमाणात बदल झाला नाही. जातीय स्थिरीकरण व जातीय श्रमविभागणीमुळे इच्छा असूनही अनेकांना सामाजिक दबावा पोटी परंपरागत व्यवसाय करावा लागत आहे. भारताच्या संबधाने विचार करावयाचा झाल्यास सामाजिक (जाती) स्थिरिकरणानुसारच आर्थिक स्थिरीकरण झालेले दिसुन येते.

भारतीय जाती व्यवस्थेची मुळे वैदिक संस्कृतीमध्ये आहेत वैदिक काळात चार वर्ण होते या वर्ण व्यवस्थे संदर्भात श्रमविभागणीतुन समाजाची विभागणी झाली असल्याचा अनेक समाज शासत्रज्ञांचा दावा आहे. समाजातील श्रमविभागणीचा आधार कोणता, इतर वर्णात जाण्यासाठीची पात्रता काय? ही पात्रता कोण निश्चित करणार हे वर्ण व्यवस्थे संदर्भात उपस्थित असलेले प्रश्न असून या प्रश्नाबाबत वर्ण व्यवस्था अनुत्तरीत आहे म्हणुनच भारतीय जातीव्यवस्थेची मुळे वर्ण व्यवस्थेत असल्याचे ठामपणे सांगता येते, वैदिक काळात निर्माण झालेली ही वर्ण व्यवस्था गौत्तम बुद्धानी आपल्या तत्वज्ञानाने खोडून

काढून समताधिष्टीत समाज निर्मितीची विचारधारा भारतीय समाजात पहिल्यांदा रुजविली यातुनच नाव्ही (नाभिक) असलेला नंद राजा, धनगर असलेला चंद्रगुप्त मौर्य आर्य चाणक्य उर्फ कोटील्याची देणगी, चांडाल मातेचा पुत्र असलेला सम्राट अशोक हे राजे आणि सम्राट बनु शकले.

जाती व्यवस्थेच्या निर्मितीचा कालखंड बौद्ध कालखंडानंतर आडिचशे ते साडेतिनशे वर्षाचा कालखंड आहे. याच काळात जाती व्यवस्था अधिक कठोर व मनुस्मृती सारख्या ग्रंथाद्वारे सुत्रबध्द झाली आणि भारतीय समाजाने ती मान्य केली. भारतात आलेल्या मोगलानी इस्लाम धर्माचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात केला पण कालांतराने इस्लाम धर्मानेही भारतीय जाती व्यवस्थेचा स्विकार केला, त्यानंतर आलेल्या ब्रिटीशानी ख्रिचन धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणात केला पण या धर्मातही जाती व्यवस्था कायमची रुजली गेली. त्यामुळे भारतातल्या प्रत्येक धर्मात जातीव्यवस्थेचे अंश आढळून येतात. हिच जाती व्यवस्था भारतीय समाज व्यवस्थेचा आधार झाला असून व्यक्ती आणि समाजाला त्या व्यवस्थेने विभागुन टाकले आहे. ही व्यवस्था व्यक्ती विकासाला पोशक नसून ती व्यक्तीच्या गुण कौशल्याला घातलेली बंदी आहे. अशाच या भारतीय जाती व्यवस्थेतील सलुन (केसकर्तन) व्यवसाय करणारी नाभिक ही एक जाती असून न्हावी, नापित, वारिक, महली, हजाम इत्यादी नावानेही ती ओळखल्या जाते. नाभिक समाज हा बारा बलुत्तेदार या वर्गात मोडणारा असून केसकर्तन, श्मश्रू (दाढी) करणे, केशभूषा करणे हे काम करते. याव्यतिरिक्त गावातील लग्न कार्यात जेवणाचे आमंत्रण देणे, जावळ काढणे, सामाकि सण उत्सवामध्ये मशाल धरणे इत्यादि प्रकारची गावकीची कामे हा समाज करत असतो. बलुतेदारी पध्दतीमध्ये धान्याच्या मोबदल्यात सेवा देण्याचे काम नाभिक समाज करत होता व वर्तमान काळातही काही खेडेगावात आजही बलुतेदारीचे अस्तित्व असल्याचे पहावयास मिळते. भारतीय समाज जीवनामध्ये बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार या समाज घटकांना

अतिशय महत्वाचे स्थान आहे. बाराबलुतेदार वर्ग हा सेवा देणारा व अठरा अलुतेदार हा सेवा घेणारा समाज घटक आहे. नाभिक समाज हा प्रामुख्याने केसकर्तनाचा व्यवसाय करतो व आजही तो हाच व्यवसाय करतो अनेक स्थित्यंतरानंतरही हा समाज आपल्या परंपरागत व्यवसायाला चिटकुन असून ह्या चिटकुन राहण्याची काय कारणे आहेत तसेच परंपरागत व्यवसायाचा त्यांच्या कौटुंबिक विकासावर काय परिणाम झाला आहे, नाभिक समाजाच्या विकासासाठी उपाय योजनांचा अभ्यास होणे महत्वाचे आहे.

नाभिक समाज हा नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात आढळून येतो, खेडेगावात वास्तव्य करणारा नाभिक समाज आज मोठ्या प्रमाणावर रोजगारीसाठी शहरामध्ये स्थलांतर करताना दिसत आहे. नाभिक समाजातील बहुसंख्य लोकांचा केसकर्तन हाच व्यवसाय असल्यामुळे नाभिक समाजामध्ये व्यावसायिक विविधता दिसून येत नाही.

१.२ संशोधन पध्दती :

संशोधनाचा विषय ठरल्यानंतर विषयाची माहिती कशी गोळा करायची ही संशोधनाची पहिली पायरी आहे. संशोधन कर्त्यानी "मराठवाडा विभागातील नाभिक समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा" असा विषय निवडला असून प्रस्तुत विषय नाभिक समाजाच्या आर्थिक व सामाजिक समस्या सोडवण्यासाठी उपयोगी पडणार आहे. यात प्राथमिक व द्वितीयक सामुग्रीचा वापर करण्यात आला असून प्रथम सामग्री या नात्याने मुलाखत अनुसुचीच्या आधारे २०० व्यक्तीचे सर्वेक्षण करण्यात येणार असून द्वितीयक सामुग्रीमध्ये विविध संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे, वार्षिकांक, मासिके, साप्ताहिके, दैनिके, विविध अहवाल, विविध पुस्तक या सर्वांचाच वापर करून गृहितके सिध्द करण्यात येणार आहे.

१.२.१ संशोधन म्हणजे काय -

संशोधन हा शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करून बुध्दीनिष्ठ आणि व्यावहारिक अशा प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा एक प्रयत्न आहे. अनुभव कक्षेत येणाऱ्या घटकातील उत्तरे मिळण्याची शक्यता वाढावी याच उद्देशाने शास्त्रीय पध्दतीचा विकास झालेला आहे. सत्याचे आकलन होण्यासाठी दुसरा पर्यायच नाही. संशोधनावरील व्याख्या लक्ष्यात घेवून संशोधनासाठी निवडलेल्या विषयांची माहिती कशी गोळा करायची या प्रश्नाला अनुसरून संशोधन आराखडा कसा निवडता येईल यासाठी संशोधकाने विचार केला आहे.

१.२.२ संशोधन विषयाची निवड -

प्राचीन काळापासून नाभिक समाज हा भारतीय समाज व्यवस्थेचा एक भाग असून अनेक समाज घटकांविषयी यापुर्वी संशोधन करण्यात आलेले आहे. पण नाभिक समाजावर फार कमी संशोधन झालेले आहे. तसेच आर्थिक व सामाजिक स्थिती ह्या एक दुसऱ्यावर अवलंबुन असल्याने दोन्ही बाबींचा एकत्र अभ्यास करणे गरजेचे असताना या पुर्वीच्या संशोधनामध्ये ते दिसून येत नाही. नाभिक समाजाच्या आर्थिक व सामाजिक मागासलेपणाचा अभ्यास करून या समाजाच्या विकासासाठी व समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी काय उपाय योजना करता येतील यासाठी या संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे.

१.२.३ संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये -

१. नाभिम समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. नाभिक समाजाच्या उत्पन्न व रोजगाराचा अभ्यास करणे.

३. नाभिक समाजाच्या उपभोग खर्चाचा अभ्यास करणे.

४. नाभिक समाजाच्या आर्थिक मागासलेपणाचा शोध घेणे.

१.२.४ संशोधन विषयाची गृहितकृत्ये -

१. नाभिक समाज आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागास आहे.

२. नाभिक समाज शिक्षण या बाबतीत मागासलेला आहे.

३. नाभिक समाजाची उपजिविका परंपरागत व्यवसायावर अवलंबुन आहे.

४. नवनविन तंत्रज्ञानामुळे नाभिक समाजाच्या परंपरागत व्यवसायावर परिणाम होत आहे.

१.२.५ संशोधन विषयाचे महत्व -

भारतीय समाज जीवनामध्ये १२ बुलतेदार १८ अलुतेदार या दोन समाजाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. १२ बलुतेदार हा सेवा देणारा तर १८ अलुतेदार हा सेवा घेणारा समाज घटक आहे. त्यांनाच प्रचलीत ग्रामीण भाषेत कारू व नारू असेही म्हणतात. नाभिक समाज हा १२ बलुतेदार यामध्ये मोडतो. पुर्वापार पासून नाभिक समाज हा केशकर्तनाचा व्यवसाय करतो व आजही तो हाच व्यवसाय करतो. त्यामुळे अनेक स्थित्यंतरानंतरही हा समाज आपल्या परंपरागत व्यवसायाला चिटकुन असून या चिटकुन राहण्याचे काय कारणे आहेत, तसेच या परंपरागत व्यवसायाचा त्यांच्या कुटुंबावर व विकासावर काय परिणाम झाला आहे याचा अभ्यास करणे तसेच या व्यवसायात नाभिक समाजाच्या विकासासाठी काय बदल करणे अपेक्षित आहे याचा शोध घेणे. एकंदरीत भारतीय समाज व्यवस्थेत दुर्लक्षित राहिलेल्या नाभिक समाजाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी काय उपाय योजना करता येतील याचा अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे. भारतीय समाजात जातीय स्थिरीकरण असून एकसंघ भारत निर्माण करण्यासाठी तसेच सशक्त भारतासाठी सर्व समाज घटकांचा समान विकास होणे गरजेचे आहे.

१.२.६ संशोधन आराखडा -

निष्कर्ष व संशोधनाचे उद्दिष्टे याची संबंधता व संशोधन कार्यात मितव्ययता यांची सागंड घालता येईल, अशाप्रकारे तथ्याची नियोजीत व्यवस्था म्हणजे संशोधन आराखडा होय. या वरुन प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकांने नाभिक समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीच्या अध्ययनासाठी संशोधकांने अन्वेषणात्मक आराखडा निवडला. या आराखड्यामुळे गृहित्यकृत्यांची संशोधनानंतर मांडणी करण्यास व समस्येचे सुस्पष्ट स्पष्टीकरण करण्यास मदत होईल.

संशोधनातील निष्कर्ष किती अचुक राहतील यांची संशोधकाला देखील कल्पना नसते. त्यामुळे संशोधनात अनेक दोष राहु शकतात म्हणून अध्ययनातील निष्कर्ष काढणे व वेळ आणि श्रमांची बचत करण्याचा दृष्टीने अन्वेषणात्मक आराखडा आवश्यक असतो. विशिष्ट व्यक्तींच्या स्थितीच्या वैशिष्ट्यांचे वा लक्षणांचे संशोधन करणे हा अन्वेषणात्मक आराखड्यांचा उद्देश असतो. त्याद्वारे त्यांचे स्पष्टीकरण केले जाते.

या अध्ययनाचे दुसरेही कार्य असते. संशोधन कर्ता ज्या विषयाचे अध्ययन करू शकतो त्या विषयासंबंधीच्या चौकशीला सरंचनाबध्द स्वरुप देण्यास संशोधकाला विषयाच्या विभिन्न पैलुची माहिती प्राप्त करून देणे हे अन्वेषणात्मक आराखड्यांद्वारे प्राप्त होऊ शकतो. सोबतच संकल्पनाच्या स्पष्टीकरणासाठी पुढील संशोधन कोणत्या समस्याची उत्तरे शोधण्यासाठी संचलित करता येते.

डी. काट्झ म्हणल्याप्रमाणे अन्वेषणात्मक अध्ययन शास्त्राच्या स्थितीचे अध्ययन आणि प्रतिनिधित्व करणारे असतात.

१.२.७ नमुना निवड पध्दती -

नमुना हा विश्व किंवा समग्रातुन निवडण्यात आलेला भाग असतो. या विश्वातील एका घटकास किंवा सदस्यास व्यष्टी असे म्हणतात. विश्व किंवा समग्रातील फक्त काही प्रातिनिधिक एककांची निवड करणे म्हणजेच नमुना निवड होय. या बाबतीत गुड आणि हॅट असे नमुद करतात की, नमुना हा त्यातील नावांप्रमाणेच एक विस्तृत समुहाचा लघु प्रतिनिधी आहे. मागील व्याख्यावरुन विश्व किंवा समग्रातील एकुण एककांपैकी काही प्रतिनिधी एककांची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय.

वरील दृष्टीकोन लक्षात घेऊन संशोधकाने पैसा, वेळ, श्रम यांचा विचार करून संशोधनातील संभाव्य व गैरसंभाव्य नमुना निवड प्रकारातील निधीअष्टांश नमुना निवड पध्दती (Quota smapling) संशोधकांने उपयोगात आणली. नादेड जिल्ह्यातील २०० नाभिक समाजातील व्यक्तींचा नमुना अंर्तभाव केला आहे. या ठिकाणी एकक ही संज्ञा जोडण्यांसाठी उपयोगात आणली आहे.

या समग्राबाबत काही विधाने व निष्कर्ष मांडु इच्छितो त्या समग्राचे प्रतिरुप ठरेल असा नमुना निवडने कोटा पध्दतींचे प्रमुख उद्दिष्ट असते. समग्रातील विविध घटक लोकसंख्येत ज्या प्रमाणे आढळतात त्याप्रमाणे नमुन्यातही प्रातिनिधीत्व मिळावे याची कोटा पध्दती विश्वसार्हता असते असे म्हटले जाते. कोटा निवड पध्दतीत निवड करण्याच्या तीन पध्दती आहेत.

ज्या लक्षणांचे दृष्टीने महत्वपूर्ण वाटतात अशा गुणधर्माच्या आधारे त्यांचे गट पाडले जातात. प्रत्येक वर्गात व्यक्तीचे एककांचे प्रमाण काय हे समग्राच्या ज्ञान गृहीत व अनुमानीत घडणीप्रमाणे ठरविले जाते.

प्रत्येक मुलाखतकार किंवा निरीक्षकास उत्तरदात्यांना ठराविक कोटा दिला जातो किंवा प्रत्येकाने किती व्यक्तींची मुलाखत घ्यायची हे पुर्वीच ठरविण्यात येते. तरीही मुलाखतकारास किंवा मुलाखतीसाठी वा निरीक्षणांसाठी कोणाची निवड होईल व कोणाची निवड होणार नाही हे मुलाखतकारांच्या किंवा निरीक्षकाच्या वैयक्तिक निर्णयावर अवलंबुन असते. प्रमाणानुसार पुर्व नमुन्यात त्यांच्या वर्गाच्या नमुना प्रतिकृतीला व नमुन्यास स्थान मिळेल याची काळजी घेतली जाते.

१.२.८ तथ्य संकलन पध्दती -

समग्राची निवड केल्यानंतर संशोधकानी या समग्रातुन तथ्य संकलन करण्यासाठी पुढीलप्रमाणे तथ्य संकलन पध्दती निवडली. समग्रातील व्यष्टीनुसार अध्ययन करून तथ्य गोळा करण्यासाठी संशोधकानी तथ्य संकलनातील विविध पध्दतीचा अभ्यास करून त्यातील अभ्यासाला अनुरूप पध्दती लक्ष्यात घेतल्या, तथ्यांचे संकलन करण्यापुर्वी तथ्य संकलनाची व्याख्या करणे सोयीस्कर ठरते.

दुर्खीमच्या मते, सामाजिक तथ्य व्यवहारांचा विचार, अनुभव व क्रिया असा पक्ष आहे की, ज्यांचे निरीक्षण वस्तुनिष्ठ स्वरूपात शक्य आहे आणि जे एका विशिष्ट तऱ्हेने व्यवहार करण्यास सहाय्य करते. सामाजिक शास्त्रात तथ्य हे सर्वमान्य व्यक्तींच्या विचारलेल्या व त्यांच्यासमोर प्रस्तुत केल्या गेलेल्या चेतकांच्या संदर्भात त्यांनी व्यक्त केलेल्या प्रत्युतरांच्या व प्रतिक्रियांच्या नोंदीच्या स्वरुपात असतात.

इतर शास्त्राप्रमाणे सामाजिक शास्त्रात ही ज्ञानेंद्रियांच्या आधारे होणारा स्थितीबोध वा निरीक्षण हाच तथ्य प्राप्तीचा आधार आहे. तथ्य संकलनातील प्रामाणिकता व विश्वसनियतेवरच संशोधनाचे महत्व अवलंबुन असते वरील दृष्टीकोन लक्ष्यात घेतला आणि पुढील संकलन तंत्राची निवड केली.

१.२.९ तथ्य संकलनाची प्राथमिक साधने -

१.२.९ अ) निरीक्षण पध्दती

घटना व वर्तन घडत असतांना प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहुन जसेच्या तसे लिहुन ठेवणे वा लक्ष्यात ठेवणे म्हणजे निरीक्षण होय असे पोलीन यंग यांनी म्हटले आहे. निरीक्षण पध्दतीचा वापर करून प्राथमिक स्वरुपाचे तथ्य संकलनासाठी मुलाखत घेतानाच संशोधकानी उत्तरदात्यांच्या वस्त्या, निवासस्थाने, पुजास्थाने, घरातील, घरातील वस्तु, देवदेवतांची चित्रे वागण्या बोलण्याचा व त्यांचा राहणीच्या पध्दती इत्यादींच्या नोंदी करून ठेवण्यासाठी प्राथमिक स्वरुपांचे तथ्य संकलन तंत्र म्हणुन निरीक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

१.२.९ ब) मुलाखत तंत्र

उत्तरदात्यांना प्रश्नांची उत्तरे विचारून समस्या सोडविण्यास किंवा संबंधीत माहिती मिळविण्यास मुलाखत तंत्र महत्वाचे आहे. संशोधकांने मुलाखत तंत्राचा वापर करून नांदेड जिल्ह्यातील नाभिक समाजाच्या व्यक्तीकडून (उत्तरदात्यांकडून/समग्रहातुन) माहिती संकलन केली. मुलाखतीद्वारे तथ्य संकलन करण्यासाठी संशोधकांनी दोन विद्यार्थ्यांची मदत घेतली. त्यातील एक विद्यार्थी अर्थशास्त्र व दुसरा समाजशास्त्र या विषयात शिक्षण घेत आहेत. संशोधकाने या दोघांना संशोधन विषयी विशेष मार्गदर्शन करून त्यांना मुलाखत सुची समजावुन सांगीतली व स्वतः बरोबर घेऊन उत्तरदात्यांची मुलाखत घेतली. त्यानंतर काही फोटो काढुन मुलाखत घेतली. मुलाखत तंत्र म्हणजे दोन किंवा अधिक व्यक्तींमधील संवाद किंवा मौखीक प्रतिसाद असतो. या मुलाखतींकरीता एक मुलाखत अनुसुची तयार केली व मार्गदर्शकांकडून अनुसुची तपासुन घेतल्यानंतर मुलाखत अनुसुचीप्रमाणे उत्तरदात्यांना प्रश्न विचारून मुलाखत अनुसुचीत तथ्य संकलीत करण्यात येतील.

संशोधक स्वतः हा अध्ययन क्षेत्रात जाऊन संबंधीत समस्येच्या संबंधात जीवंत व्यक्तींकडून मुलाखत अनुसुची किंवा प्रश्नावलींच्या साह्याने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे काही माहिती तथ्य गोळा करतो, त्यास प्राथमिक तथ्ये म्हणतात. प्राथमिक तथ्य अधिक वस्तुनिष्ठ स्वरुपांचे असतात. जीवंत व्यक्ती व निरीक्षण ही प्राथमिक तथ्यांची स्त्रोत आहेत. प्राथमिक तथ्ये संशोधकाने स्वतः गोळा केलेली असतात. ती लिखीत स्वरुपात व अलिखीत स्वरुपात असतात. त्या तथ्यांत प्रलेख, अहवाल, पत्रे, सांख्यीकी, दैनंदिनी हस्तलिखीते इत्यांदी विषयक माहिती संशोधनास मदत करते.

१.२.१० तथ्य संकलनाची दुय्यम साधने -

नांदेड जिल्ह्यातील माहिती गोळा करण्यासाठी संशोधकांनी स्वतः नांदेड जिल्ह्याच्या ऐतिहासिक व भौगोलीक, लोकसंख्या व कार्यालयीन माहिती करीता पुस्तके, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, ग्रामपंचायतीचे रेकॉर्ड, नगरपालीकेचे रेकॉर्ड, जिल्हा समाजकल्याण कार्यालये, तहसील कार्यालयाचे रेकॉर्ड इत्यादी ठिकाणाहून माहिती गोळा करून व संदर्भ ग्रंथ वाचुन त्या माहितीचा अध्ययनात वापर करण्यात येणार आहे.

१.२.११ संशोधन क्षेत्राची व्याप्ती व मर्यादा -

संशोधन क्षेत्राची व्याप्ती लक्षात घेता हा विषय नाभिक समाजाची निगडीत असल्यामुळे तो प्रामुख्याने पुरुषांशी संबंधीत आहे परंतु केशकर्तन हा अत्यावश्यक गरजाशी संबंधीत असल्यामुळे व त्यामुळे रहाणीमान तर सुधारतेच परंतु त्याचा जीवनमानाशी जवळचा संबंध आहे, त्यामुळे हा व्यवसाय अतिशय महत्वाचा व जीवनावश्यक असा म्हणून ओळखला जातो त्यामुळे ह्या व्यवसायाची व्याप्ती म्हणजे ५० टक्के लोकसंख्येशी संबंधीत असा हा व्यवसाय आहे, त्यामुळे जीवनाच्या दृष्टीने तो महत्वाचा आहेच परंतु त्याबरोबर म्हसी, रेडे व मेंढ्याची ही कटींग करावी लागते त्यामुळे पशुपालनासही हा

व्यवसाय मदत करतो. त्यामुळे महत्वाचा आहे. प्रस्तुत संशोधनाचा विषय हा नांदेड जिल्ह्यातील नाभिक समाजाची आर्थिक व सामाजिक स्थिती हा असल्यामुळे संशोधनाची व्याप्ती ही नांदेड जिल्ह्यापुरती मर्यादित आहे.

संदर्भ सूची :

१. आगलावे प्रदिप, (२०००), सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर, पृष्ठ क्र.१६५, १८१.

२. भांडारकर पु.ल. (१९८७), संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपुर, पृष्ठ क्र.२१३.

३. अत्रे टी.एन. (१९५९), गावगाडा, वरद प्रकाशन पुणे, पृष्ठ क्र.९३-१२०.

४. खरात शंकरराव (२०११), गावचे अलुतेदार आणि बलुतेदार, इंद्रायणी साहित्य प्रकाशन पुणे, पृष्ठ क्र.२०.

५. श्रीनिवास एम.एन. (२००९), आधुनिक भारत मे जाती, राजकमल प्रकाशन प्रा.लि. नई दिल्ली, पृष्ठ क्र.१२७.

६. चौधरी एस.व्ही. (२०१५), ग्रामीण समाज व विकास, प्रशांत पब्लिकेशन जळगांव, पृष्ठ क्र.६३.

७. लुलेकर पी. (२०१२), गाव गाड्याचे शिल्पकार, स्वरुप प्रकाशन, पृष्ठ क्र.४७.

८. जाधन एन.बी. (१९९७), अ स्टडी ऑफ द पॉसीबीलीटीझ आफ रिनीव्हेशन ऑफ बलुतेदार ॲन्ड अलुतेदार सिस्टीम इन मॉर्डन इकॉनामीक लाईफ ऑफ रुरल एरिया, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अप्रकाशीत प्रबंध, पृष्ठ क्र.७४.

संशोधक

बालाजी गोविंद कोंडामंगल
सामाजिकशास्त्र संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.स्वामी एस.डी.
श्री दत्त कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
हदगांव ता.हदगांव जि.नांदेड